# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.08.2026** **वारःशनिवार**

---

1. सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंध सुधारण विधेयक 2026 ला राष्ट्रपतीची मंजुरी
2. देशातील भरकटलेल्या तरुणाईला राष्ट्रनिर्मिती आणि राष्ट्रहिताच्या भावनेतून योग्य मार्गावर आणलं पाहिजे, पंतप्रधानांचं प्रतिपादन
3. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर; राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांना लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कारानं सन्मानित करणार
4. भारत आणि चीनमधला व्यापार आज सिक्कीममधील 'नथू-ला' खिंडीतून पुन्हा सुरू
5. राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धेत जूडोमध्ये भारतीय खेळाडूंची सुवर्णपदकांची ऐतिहासिक कामगिरी आणि
6. देशाच्या विविध भागात आज मुसळधार पावसाचा अंदाज

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी सार्वजनिक परीक्षा गैरव्यवहार प्रतिबंध सुधारण विधेयक 2026ला मंजुरी दिली आहे. संसदेच्या दोन्ही सभागृहांत हे विधेयक मंजूर करण्यात आलं होतं. सार्वजनिक परीक्षांमधील गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कठोर शिक्षेची तरतूद आणि जलदगती न्यायालयांची स्थापना करणे, हा या विधेयकाचा मुख्य उद्देश आहे.

**<u>पंतप्रधान-युवा संदेश</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटले आहे की, शिवीगाळ आणि द्वेषातून कोणत्याही समस्या सुटू शकत नाहीत. भरकटलेल्या तरुणांबद्दल सहानुभूती बाळगण्याचं आवाहन करत त्यांना शिक्षा करण्याऐवजी राष्ट्रनिर्मिती आणि राष्ट्रहिताच्या भावनेतून त्यांना योग्य मार्गावर आणलं पाहिजे, असं मत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी समाजमाध्यमावरून जारी केलेल्या ध्वनिचित्र संदेशात व्यक्त केलं आहे. नवी दिल्लीत जंतर-मंतर इथं अलीकडंच घडलेल्या घटनेचा उल्लेख करत त्यांच्याविरुद्ध आणि त्यांच्या दिवंगत मातेविरुद्ध अपमानास्पद भाषेचा वापर करण्यात आलेल्या वर्तनाबद्दल समाजात निर्माण झालेला राग आणि निराशा आपण समजू शकतो,मात्र या तरुणांना न्यायालयीन प्रक्रियेत अडकवण्याऐवजी समाजानं त्यांना स्वीकारलं पाहिजे आणि योग्य मार्ग दाखवला पाहिजे असं आवाहन पंतप्रधानांनी केलं.

**<u>मोदी-ब्रिटन पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ब्रिटनचे पंतप्रधान अँडी बर्नहॅम यांच्याशी संवाद साधून त्यांनी पंतप्रधानपदाचा पदभार स्वीकारल्याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं. यावेळी दोन्ही नेत्यांनी तंत्रज्ञान, नवोपक्रम, संरक्षण, सुरक्षा, स्वच्छ ऊर्जा, शिक्षण आणि जनसंपर्क यांसारख्या क्षेत्रांमध्ये एकत्रितपणे काम करण्यावर आणि धोरणात्मक भागीदारी वाढवण्याबाबत सहमती दर्शवली, असं पंतप्रधान मोदी यांनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे.

**<u>मेटा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची फेसबुक संदेश सेवा मर्यादित केल्याप्रकरणी केंद्र सरकारनं मेटा कंपनीला याबाबत विचारणा केली आहे. पुढील आठवड्यात मेटा कंपनीच्या सदस्यांची संसदीय समितीसमोर चौकशी होण्याची शक्यता आहे.

**<u>पंतप्रधान-दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज आंध्र प्रदेश आणि कर्नाटकच्या एकदिवसीय दौऱ्यावर जात आहेत. या दौऱ्यात आंध्र प्रदेशमधल्या विजयनगरम जिल्ह्यातील भोगपुरम इथं 18,000 कोटी रुपये खर्चाच्या विविध विकासकामांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण

पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.तसंच कर्नाटकातल्या म्हैसूर इथं स्वामी विवेकानंद सांस्कृतिक युवा केंद्र विवेक स्मारकाचं उद्घाटनही त्यांच्या हस्ते होईल.

**अमित शहा दौरा**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज पुणे दौऱ्यावर आहेत. काल रात्री ते पुण्यात दाखल झाले. लोकमान्य टिळक स्मारक ट्रस्टच्या वतीनं दिला जाणारा लोकमान्य टिळक राष्ट्रीय पुरस्कार आज अमित शहा यांच्या हस्ते प्रदान केला जाणार आहे. राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोभाल यांना हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याआधी शहा लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करणार आहेत.

**ट्रम्प**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी लष्कराला या आठवड्याच्या शेवटी इराणवर नव्यानं हल्ला करण्याची तयारी करण्याचे निर्देश दिले आहेत. अमेरिकन माध्यमांनी दिलेल्या वृत्तानुसार, या प्रस्तावित कारवाईचा उद्देश इराणवर शरणागती पत्करण्यासाठी दबाव आणणं हा असून इराणच्या ऊर्जा सुविधा, वीज केंद्र आणि तेल शुद्धीकरण कारखान्यांवर हल्ले होण्याची शक्यता आहे.

**भारत-पाक**

पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधल्या तथाकथित निवडणुका म्हणजे पाकिस्तानी व्यवस्थेचा झालेला अपमानजनक अस्वीकार आहे, असं मत परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी व्यक्त केलं. ते काल नवी दिल्लीत प्रसारमाध्यमांशी बोलत होते. पाकिस्तानी यंत्रणा पाकव्याप्त काश्मीरमधल्या नागरिकांविरुद्ध निर्दयीपणानं बळाचा वापर करत असून यामध्ये 40 हून अधिक नागरिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे तर अनेकजण गंभीर जखमी झाले आहेत, या हिंसक कारवाईची आंतरराष्ट्रीय समुदायानं चौकशी करण्याचं आवाहन भारतानं केलं आहे, असंही जयस्वाल यांनी सांगितलं.

**भारत-चीन व्यापार**

भारत आणि चीन देशांमधला सीमावर्ती व्यापार आज सिक्कीममधील 'नथू-ला' खिंडीतून पुन्हा सुरू होत आहे. यामुळे या दोन शेजारी देशांमधील एका महत्त्वाच्या व्यापारी मार्गाचं पुनरुज्जीवन होणार आहे. या व्यापारामुळे कोविड-19 संकट काळात 2020 पासून लागू असलेली सहा वर्षांची स्थगिती संपुष्टात आली आहे. या व्यापारामुळे सीमापार वाणिज्यिक व्यवहारांना चालना मिळण्याची आणि नोंदणीकृत व्यापारी, वाहतूकदार आणि संबंधित व्यवसायांना लाभ होणार आहे. चार दशकांहून अधिक काळ बंद राहिल्यानंतर, नथू-ला मार्गावरील व्यापार यापूर्वी 2006 मध्ये पुन्हा सुरू करण्यात आला होता.

**जयशंकर**

परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्री अब्बास अराघची यांच्याशी दूरध्वनी वरुन संपर्क साधून पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. व्यावसायिक जहाजं आणि खलाशांवर कोणत्याही प्रकारचा हल्ला होऊ नये, याविषयी भारताच्या ठाम भूमिकेवर त्यांनी भर दिला.

**अण्णाभाऊ साठे**

लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, विचार आणि सामाजिक कार्य हे केवळ महाराष्ट्रापुरतं मर्यादित नसून संपूर्ण जगाला प्रेरणा देणारं आहे. असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. ते काल, घाटकोपर इथल्या चिरागनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या वतीनं उभारण्यात येणाऱ्या 'लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन आणि प्रशिक्षण संस्था आणि स्मारकाच्या पहिल्या टप्प्याच्या भूमिपूजन समारंभात बोलत होते. लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांनी आपलं संपूर्ण आयुष्य वंचित, शोषित आणि कष्टकरी समाजाच्या न्याय, स्वाभिमान आणि हक्कांसाठी समर्पित केलं, असं उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले. तर, आर्टी ही मातंग समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाची संस्था ठरेल, असा विश्वास केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी यावेळी व्यक्त केला.

**दिल्ली-पिंककार्ड**

दिल्ली सरकारने आपल्या बसेसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा मिळवण्यासाठी 'पिंक सहेली स्मार्ट कार्ड'चा वापर अनिवार्य करण्याच्या मुदतीत 16 ऑगस्टपर्यंत वाढ केली आहे. सुधारित निर्णयानुसार, वाहक 15 ऑगस्टपर्यंत अशी गुलाबी तिकिटे देणे सुरूच

ठेवतील. स्मार्ट कार्ड-आधारित प्रणालीकडे सुरळीतपणे संक्रमण करण्यासाठी आणि या बदलाच्या काळात कोणत्याही पात्र प्रवाशाची गैरसोय होऊ नये, यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं दिल्लीचे परिवहन मंत्री डॉ. पंकज कुमार सिंग यांनी सांगितलं.

**राष्ट्रकुल**

राष्ट्रकुल क्रिडा स्पर्धेत जूडोमध्ये प्रथमच भारताने सुवर्ण कामगिरी केली आहे. भारताच्या अस्मिता डे आणि हर्ष सिंग यांनी सुवर्ण पदकं पटकावली तर यामिनी मौऱ्यानं रौप्य पदक पटकावलं. तसंच भालाफेक स्पर्धेत नीरज चोप्रानं रौप्य पदक आणि यशवीर सिंगनं कास्य पदक पटकावलं. आतापर्यंत पाच सुवर्ण, बारा रौप्य आणि सहा कास्य पदकांची कमाई करत भारत 23 पदकांसह पदकतालिकेत 10 व्या स्थानावर आहे.

**राष्ट्रपती**

राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत डेकॅथलॉन प्रकारात कास्यपदक जिंकल्याबद्दल राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी खेळाडू तेजस्विन शंकर याचं अभिनंदन केलं आहे. त्याची ही कामगिरी म्हणजे भारतीय ॲथलेटिक्ससाठी एक 'ऐतिहासिक पहिली घटना' आहे, असं राष्ट्रपतींनी समाजमाध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. तो यशाची नवनवीन शिखरं सर करत राहील आणि देशाला अधिक गौरव मिळवून देईल, असा विश्वासही राष्ट्रपतींनी व्यक्त केला आहे.

**ओडिशा**

ओडिशामधील पूरस्थिती गंभीर असून, राज्यातील अनेक नद्या दुथडी भरून वाहत असल्यामुळे शेकडो गावन अजूनही पाण्याने वेढलेली आहेत. मुख्यमंत्री मोहन चरण माझी आज सकाळी पूरग्रस्त जिल्ह्यांची हवाई पाहणी करणार असून वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत बचाव, मदत आणि पूर्ववत करण्याच्या उपाययोजनांचा आढावा घेतील. हिराकुड जलाशयातील पाणी पातळी 625.47 फुटांपर्यंत पोहोचली असून, पाण्याची आवक नियंत्रित करण्यासाठी धरणाचे 22 दरवाजे उघण्यात आले आहेत. दरम्यान, उद्या सकाळपर्यंत 20 जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने आज पूर्व राजस्थान, मध्य महाराष्ट्र, कर्नाटक किनारपट्टी कोकण, गोवा, आणि केरळमध्ये मुसळधार ते अति मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. उत्तरेकडील काही राज्यातही मुसळधार पावसाची शक्यता आहे. गेल्या 4-5 दिवसांपासून महाराष्ट्रात सुरू असलेल्या पावसाने अनेक भागात नुकसान झालं असून पूरस्थिती निर्माण झाली आहे. राज्यात 6 जणाचा मृत्यू झाला असून 4 जण बेपत्ता आहेत.

# याबरोबर हे राष्ट्रीय बातमीपत्र संपल, नमस्कार.